# आदिवासी समाज आणि विकासाची संकल्पना - एक अभ्यास

**मठपती ऋषीकेश सुभाष**

**गोषवारा**

परंपरागत विकासाची संकल्पना प्रामुख्याने आर्थिक वाढ, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारावर केंद्रित होती. परंतु आदिवासी समाजाच्या संदर्भात केवळ आर्थिक वाढ म्हणजे विकास असे मानणे अपुरे ठरते. आदिवासी विकासामध्ये सामाजिक न्याय, सांस्कृतिक स्वायत्तता, नैसर्गिक संसाधनांवरील अधिकार, शिक्षण, आरोग्य, रोजगार, राजकीय सहभाग आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा समावेश असणे आवश्यक आहे. आदिवासी समाज हा भारतीय सामाजिक संरचनेचा प्राचीन व महत्त्वपूर्ण घटक आहे. आदिवासी समुदायांचे जीवन निसर्ग, जंगल, जमीन, जलस्रोत आणि पारंपरिक सामाजिक संस्थांशी अतिशय जवळून जोडलेले आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकासाची संकल्पना स्वीकारली. तथापि, विकासाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी समाजाचा समावेश करताना विस्थापन, जंगलावरील पारंपरिक अधिकारांचा प्रश्न, रोजगाराचा अभाव, शिक्षण व आरोग्य सुविधांची कमतरता, दारिद्र्य आणि सांस्कृतिक अस्मितेचे संरक्षण यांसारखी आव्हाने निर्माण झाली. या संशोधन पेपरमध्ये आदिवासी समाजाची संकल्पना, विकासाचा अर्थ व स्वरूप, आदिवासी समाज आणि विकास यांचा परस्परसंबंध, विकासामुळे निर्माण झालेल्या समस्या, संवैधानिक तरतुदी, सरकारी धोरणे, शाश्वत विकास आणि आदिवासी-केंद्रित विकासाची आवश्यकता यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**Keywords:** आदिवासी समाज, विकास, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, विस्थापन, सांस्कृतिक अस्मिता, वनाधिकार, शाश्वत विकास, सहभागात्मक विकास.

## प्रस्तावना

आदिवासी म्हणून उल्लेख केल्यानंतर ताबडतोब भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील लढवय्य जननायक बिरसा मुंडा यांचे नाव समोर येते. बिरसा मुंडा यांच्या नावाचा नामोल्लेख टाळून आदिवासी जमातीचा अभ्यास करणे अशक्य आहे. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये बिरसा मुंडा याना विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. बिरसा मुंडा यांनी २५ वर्षांच्या अल्पजीवन कार्यात आदिवासींमध्ये स्वदेशी व भारतीय संस्कृतीच्या प्रती अतुलनीय प्रेरणा जागविली. समाज व्यवस्थेत कार्य करीत असताना त्यांनी त्रिस्तरीय पध्दतीने समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. आदिवासी समाजाचे होत असलेल्या शोषणाचे मूळ परकीय राजकीय व्यवस्थेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परकीयांच्या गुलाम गिरीतून समाजाला मुक्त करण्यासाठी त्याविरुध्द आदिवासी समाजास संघटित करुन ब्रिटिशांच्या विरोध्दात लढा दिला. परंपरेने चालू असलेल्या अघोरी आणि अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी सक्रियपणे कार्य केले. या त्यांच्या कार्यामुळे धर्मातर, शोषण व अन्यायाविरुध्द लढण्याच्या प्रवृत्तीमुळे समाजाला न्याय हक्क मिळण्याची वहिवाट दाखवून दिली. ज्यांचा आदिवासी म्हणून उल्लेख केला जातो त्या जमाती भारताच्या मूळ रहिवासी आहेत. हे देश-विदेशातील संशोधकाने केलेल्या संशोधन कार्याअंती सिध्द झाले आहे. आदिवासींच्या बाबतीत महाराष्ट्रा पूरता विचार केल्यास महाराष्ट्र

राज्याच्या एकूण ३ लाख ७हजार ७१३ चौ.कि.मी. क्षेत्रफळापैकी ५० हजार चौ.कि.मी. क्षेत्र हे आदिवासी उपयोजनेखाली येते. यांचे प्रमाण पहाता राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १६.५ टक्के एवढे आहे. २००१ च्या लोकसंख्येच्या गणनेनुसार राज्यात ८५ लाख ७७ हजार आदिवासी आहेत. यांचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी प्रमाण पहाता ८.८५ टक्के एवढे आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ४५ आदिवासी जमाती आढळतात, यामध्ये माडिया गॉड, कातकरी, कोलाम, कोरकू, पावरा, ठाकूर, भिल्ल, गोंड, वारली, आंध इत्यादीचा उल्लेख करता येईल. या जमातीपैकी केंद्र सरकारने कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड या जमातीना आदिम जमाती म्हणून अधिसूचित केल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यापैकी धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, ठाणे, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, अमरावती, यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर मध्ये सर्वाधिक संख्येने आदिवासींचे प्रमाण आहे. आदिवासी जमातींचे कल्याण आणि हिताचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने अनेक चांगल्या घटनात्मक तरतूदी आणि कायदे असूनही आदिवासींकडे दुर्लक्ष करण्याची प्रक्रिया अथकपणे चालूच आहे. आदिवासींच्या या दुर्लक्षित अवस्थेचे मूळ हे कायदेच आहेत, हा यातील विरोधाभास आहे. आदिवासींकडे लेखन आणि वाचनाची परंपरा नाही आणि त्यामुळे अशा कायद्यांची नोंद ठेऊन त्यांचा उपयोग करण्याचीही परंपरा नाही. न्यायालयाची भाषा व कामकाज त्यांच्यासाठी अनभिज्ञ आहे. अशा परंपरेच्या अभावामुळेच विगर आदिवासी या कायद्यांचा गैरफायदा उठवित असून वेगवेगळे मार्ग आणि साधनांच्या मार्फत आदिवार्सीच्या जमीनी हडपत आहेत. आदिवासींकडून बिगर आदिवार्सीकडे जमिनीचे सुलभ हस्तांतरण होत आहे. यामुळे स्थानिक प्रशासन आपल्या स्वजातीयांशी हातमिळवणी करुन सातत्याने आदिवासींचे शोषण केले जात आहे.

**३. संशोधनाची उद्दिष्टे**

या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

1. आदिवासी समाजाची संकल्पना स्पष्ट करणे.
2. आदिवासी समाजाची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये अभ्यासणे.
3. विकासाच्या विविध संकल्पनांचा अभ्यास करणे.
4. आदिवासी समाज आणि विकास यांच्यातील संबंध स्पष्ट करणे.
5. विकास प्रक्रियेचा आदिवासी समाजावर झालेला सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
6. विकासामुळे होणाऱ्या आदिवासी विस्थापनाच्या समस्येचा अभ्यास करणे.
7. आदिवासी समाजाच्या शिक्षण व आरोग्यविषयक परिस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

या अभ्यासासाठी **वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि चिकित्सक संशोधन पद्धतीचा** वापर करण्यात आला आहे.

**आदिवासी समाजाची संकल्पना**

"आदिवासी" या संकल्पनेचा संबंध एखाद्या प्रदेशातील पारंपरिक रहिवासी, विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक ओळख असलेले आणि स्वतंत्र सामाजिक जीवनपद्धती विकसित केलेले समुदाय यांच्याशी जोडला जातो. भारतीय राज्यघटनेत "Scheduled Tribes" अर्थात **अनुसूचित जमाती** ही प्रशासकीय व घटनात्मक संज्ञा वापरली आहे. त्यामुळे "आदिवासी" आणि "अनुसूचित जमाती" या संज्ञा व्यवहारात अनेकदा समानार्थी वापरल्या जात असल्या तरी त्यांचा संदर्भ वेगवेगळा असू शकतो.

## आदिवासी समाजाच्या विकासाची अवस्था

### १. आदिवासी विकासासाठी घटनात्मक तरतुदी

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. यामध्ये कलम 15(4), कलम 16(4), कलम 46, कलम 244, पाचवी अनुसूची, सहावी अनुसूची आणि अनुसूचित जमातींसाठी राजकीय प्रतिनिधित्वाच्या तरतुदी यांचा समावेश होतो. तर कलम 46 मध्ये दुर्बल घटकांच्या, विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देण्याचे आणि सामाजिक अन्याय व शोषणापासून त्यांचे संरक्षण करण्याचे राज्याचे कर्तव्य अधोरेखित केले आहे.

### २.आदिवासी समाजाची सामाजिक रचना

आदिवासी समाजामध्ये कुटुंब, नातेसंबंध, कूळ, जमात, ग्रामसंस्था आणि पारंपरिक नेतृत्व यांना महत्त्वाचे स्थान असते. परंपरागत आदिवासी समाजामध्ये परस्पर सहकार्य, सामुदायिक निर्णयप्रक्रिया आणि सामूहिक जबाबदारी यांना महत्त्व दिले जाते. आधुनिक शिक्षण, बाजारव्यवस्था, रोजगार, स्थलांतर आणि नागरीकरणामुळे या सामाजिक रचनेमध्ये परिवर्तन होत आहे.

### ३. विकासाची संकल्पना

विकास ही केवळ आर्थिक वाढीची प्रक्रिया नसून सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि मानवी क्षमतांच्या विस्ताराची प्रक्रिया आहे. परंतु आधुनिक विकासाच्या संकल्पनेत मानवी विकास, सामाजिक न्याय, समानता, पर्यावरणीय शाश्वतता आणि मानवी अधिकार यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे विकासाचे मूल्यमापन केवळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीवर न करता **मानवी जीवनमानात झालेल्या सुधारणेवर** केले पाहिजे.

### ४. जंगल आणि आदिवासी समाज

आदिवासी समाजाचे जंगलाशी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत. जंगल त्यांच्यासाठी अन्न, औषधे, इंधन, बांधकाम साहित्य आणि रोजगाराचे साधन आहे. त्यामुळे वनसंपत्तीचे संरक्षण करताना आदिवासींच्या पारंपरिक हक्कांचा विचार करणे आवश्यक आहे. वनाधिकार कायदा, 2006 मध्ये वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनवासी समुदायांच्या काही वनहक्कांना कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. यामुळे वनसंवर्धन आणि आदिवासी हक्क यांच्यात समतोल साधण्याची संधी निर्माण झाली आहे.

### ५. आदिवासी समाजाची आर्थिक रचना

आधुनिक काळात रोख अर्थव्यवस्था, बाजारपेठ, सरकारी रोजगार, औद्योगिक रोजगार आणि सेवा क्षेत्रातील संधी वाढत आहेत. मात्र कौशल्याचा अभाव, शिक्षणाची मर्यादित उपलब्धता आणि भौगोलिक दुर्गमता यामुळे आदिवासी समाजाला या संधींचा पूर्ण लाभ मिळत नाही. आदिवासी अर्थव्यवस्था पारंपरिकपणे नैसर्गिक संसाधनांवर आधारित राहिली आहे. शेती, जंगलातील लघुवनोत्पादने, पशुपालन, मासेमारी, शिकार, हस्तकला आणि मजुरी ही अनेक समुदायांची पारंपरिक उपजीविकेची साधने आहेत.

### ६. आरोग्य आणि आदिवासी विकास

आदिवासी आरोग्य धोरणामध्ये आधुनिक आरोग्यसेवेसोबत स्थानिक औषधी ज्ञान आणि सांस्कृतिक संदर्भांचाही विचार करणे आवश्यक आहे. आदिवासी भागांमध्ये भौगोलिक दुर्गमता, आरोग्य केंद्रांची कमतरता, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता, पोषणाची समस्या आणि आरोग्यविषयक जागरूकतेचा अभाव यांसारखी आव्हाने आढळू शकतात.

### ७. विकास आणि आदिवासी विस्थापन

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

आधुनिक विकास प्रक्रियेमध्ये धरणे, खाणकाम, औद्योगिक प्रकल्प, वन्यजीव अभयारण्ये, रस्ते आणि इतर पायाभूत प्रकल्पांसाठी जमीन संपादित केली जाते. अशा प्रक्रियेमध्ये आदिवासी समाजाला पारंपरिक जमीन व निवासस्थान सोडावे लागू शकते. विस्थापनामुळे केवळ घर किंवा जमीन गमावली जात नाही, तर रोजगार, सामाजिक संबंध, सांस्कृतिक स्थळे आणि पारंपरिक जीवनपद्धतीवरही परिणाम होतो.

### ८. शिक्षण आणि आदिवासी विकास

शिक्षण हे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक, उच्च, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे. मात्र दुर्गम वस्ती, शाळेपर्यंतचे अंतर, आर्थिक अडचणी, भाषिक समस्या आणि स्थलांतर यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात अडथळे येऊ शकतात.

### ९. आदिवासी महिलांचा विकास

आदिवासी महिलांचा कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक जीवनात महत्त्वाचा सहभाग असतो. शेती, वनउत्पादने, पशुपालन, घरगुती कामे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये त्यांचे योगदान मोठे आहे. मात्र शिक्षण, आरोग्य, मालमत्ता अधिकार, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग यामध्ये अनेक आव्हाने आहेत. महिला बचत गट, कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार, आरोग्य सुविधा आणि शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी महिलांच्या विकासाला चालना देता येते.

### १०. आदिवासी विकासासाठी सरकारी धोरणांची दिशा

आदिवासी विकासासाठी भारत सरकार आणि राज्य सरकारांकडून विविध योजना राबविल्या जातात. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, रोजगार, कौशल्य विकास, वनाधिकार आणि आर्थिक सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये विविध कार्यक्रम कार्यरत आहेत. मात्र योजनांची संख्या वाढविण्याबरोबरच त्यांची स्थानिक गरजांनुसार अंमलबजावणी, पारदर्शकता, लोकसहभाग आणि परिणामकारकता वाढविणे आवश्यक आहे.

### ११. आदिवासी विकासाचा नवीन दृष्टिकोन

१आदिवासी समाजाच्या विकासासाठी “आदिवासींसाठी विकास” या दृष्टिकोनाऐवजी **“आदिवासींच्या सहभागातून विकास”** हा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

### १२. आर्थिक विकास आणि रोजगार

आदिवासी समाजासाठी रोजगार हा विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. पारंपरिक उपजीविकेची साधने आधुनिक बाजारव्यवस्थेमध्ये कमी फायदेशीर होत असल्यास पर्यायी रोजगाराची गरज निर्माण होते.

### १३. राजकीय सहभाग आणि आदिवासी विकास

विकास प्रक्रियेत आदिवासी समाजाचा राजकीय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व, ग्रामसभेचा सहभाग आणि स्थानिक विकासाच्या निर्णयांमध्ये आदिवासींचा आवाज असणे आवश्यक आहे. विशेषतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये **PESA कायदा, 1996** स्थानिक स्वशासन आणि ग्रामसभेच्या भूमिकेला महत्त्व देतो.

### संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष

१. आदिवासी समाजाची जीवनपद्धती जमीन, जंगल आणि पाण्याशी निकटपणे जोडलेली आहे.
२. शिक्षण आणि कौशल्य विकास हे आदिवासी सक्षमीकरणाचे प्रभावी साधन आहे.
३. ग्रामसभा आणि स्थानिक संस्थांचा विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

४. आदिवासी संस्कृती आणि पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण विकासाचा अविभाज्य भाग असला पाहिजे.
५. आदिवासी महिलांचा आर्थिक व सामाजिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे.
६. पारंपरिक विकासाची संकल्पना आदिवासी समाजाच्या सर्व गरजा पूर्ण करण्यास अपुरी ठरते.
७. विकासामुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक, वीज आणि रोजगाराच्या काही संधी वाढल्या आहेत.
८. त्याचवेळी मोठ्या विकास प्रकल्पांमुळे विस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे.
९. विस्थापनाचा परिणाम आर्थिक जीवनाबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावरही होतो.
१०. आदिवासी समाजाच्या विकासासाठी जमीन व वनाधिकारांचे संरक्षण अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. शैलजा देवगांवकर, आदिवासी विश्व, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००६
२. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, नांदेड-हिंगोली जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, मार्च २०११
३. संतोष दास्ताने, महाराष्ट्र, नितीन प्रकाशन, पुणे आवृत्ती २०१२,
४. आदिवासी विकास विभाग, वार्षिक आदिवासी उपयोजना, २०१२-२०१३, महाराष्ट्र शासन,
५. आदिवासी विकास विभाग, प्रस्तावना, माहिती पुस्तिका सन २०११-२०१२, महाराष्ट्र शासन,
६. गारे गोंविद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेंटल प्रकाशन, द्वितीय आवृत्ती २००२,
७. www.magatribal.ac.in